# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## परकीय भाषा विभाग

**खालीलल अर्धवेळ अभ्यासक्रम जाहीर करत आहे**

**भाषा व इयत्ता :**

1. **जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम : -** *फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, जपानी* (नव्याने शिकणाऱ्यांसाठी)
2. **जलद पदविका अभ्यासक्रम : -** *जर्मन* **(यापूर्वी जर्मन भाषेचा प्रमाणपत्र किंवा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम केला असेल अशांसाठी)**

**कालावधी : १८० तास**

**केंद्रे : सन २०२२-२३ मध्ये हे अभ्यासक्रम ऑनलाइन तसेच प्रत्यक्ष अशा दोन्ही पद्दतींनी उपलब्ध असतील. मात्र, शेवटी होणारी परीक्षा प्रत्यक्ष पद्धतीनेच होईल. ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष यापैकी कोणतीतरी एकच तुकडी (बॅच) - उपलब्ध असल्यास - तुम्हाला निवडायची आहे. एकदा प्रवेश घेतल्यानंतर ऑनलाइनमधून प्रत्यक्ष किंवा उलट असा तुकडीबदल करता येणार नाही. प्रत्यक्ष समोरासमोर शिकवण्याचे वर्ग परकीय भाषा विभाग, रानडे इन्स्टिट्यूट परिसर, फर्गसन रस्ता, पुणे ४ येथे होतील. परीक्षांसंबंधी सर्व माहिती वर्गामध्ये पुरेशी आधी मिळेल.**

**जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम : -** ***फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, जपानी*** **दि ९ जानेवारी २०२३ ते २५ मे २०२३ या कालावधीत आठवड्यातून ५ दिवस रोज २ तास असे होतील. परीक्षा जून २०२३च्या पहिल्या आठवड्यात होईल.**
**जर्मन भाषेचा जलद पदविका अभ्यासक्रम : -१५ फेब्रुवारी २०२३३ ते ३० जून २०२३ या कालावधीत आठवड्यातून ५ दिवस रोज २ तास असे होतील. परीक्षा जुलै २०२३च्या पहिल्या आठवड्यात होईल.**

**वि.सू. : सर्व प्रवेश गुणवत्तेनुसार व महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक आरक्षणाच्या नियमांनुसार होतील.**

❖ **शैक्षणिक अर्हता :**

**सर्व जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम :**HSC इयत्ता बारावी उत्तीर्ण किंवा समकक्ष (SSC + ३ वर्षांचा पदविका अभ्यासक्रम)

**जर्मन भाषेचा जलद पदविका अभ्यासक्रम :**

**मुख्य अर्हता : (७० टक्के जागा)**
**परकीय भाषा विभागाचा जर्मन भाषेचा प्रमाणपत्र किंवा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण**
**समकक्ष अर्हता :**(३० टक्के जागा) खालीलपैकी काहीही एक –

१. इयत्ता बारावीमध्ये जर्मन विषयात किमान ७० टक्के गुण प्राप्त
२. FY BA/BCom/BBA यात जर्मन विषयात किमान ७० टक्के गुण प्राप्त
३. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या संस्थेतील जर्मन भाषेचे १८० तासांचे प्रशिक्षण, त्याची परीक्षा किमान ७० टक्के गुणांनी उत्तीर्ण
४. GI/MMB यांची A2 ही परीक्षा किमान ७० टक्के गुणांनी उत्तीर्ण (GUT श्रेणी)

| तुकडी | वार | प्रहर | वेळ | ठिकाण | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| जर्मन भाषेचा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा २००) | | | | | |
| G I C 5 | सोमवार ते शुक्रवार | सकाळ | ८.३० ते १०.३० | Online | पन्नास |
| G I C 6 | सोमवार ते शुक्रवार | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | पन्नास |
| G I C 7 | सोमवार ते शुक्रवार | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| G I C 8 | सोमवार ते शुक्रवार | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| जर्मन भाषेचा जलद पदविका अभ्यासक्रम (एकूण जागा १००) | | | | | |
| G I D 3 | सोमवार ते शुक्रवार | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |
| G I D 4 | सोमवार ते शुक्रवार | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |

| फ्रेंच भाषेचा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा १५०) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तुकडी | वार | प्रहर | वेळ | ठिकाण | विद्यार्थी संख्या |
| F I C 4 | सोमवार ते शुक्रवार | सकाळ | ८.३० ते १०.३० | Online | 50 |
| F I C 5 | सोमवार ते शुक्रवार | दुपार | ४ ते ६ | परकीय भाषा विभाग, पुणे ४ | 50 |
| F I C 6 | सोमवार ते शुक्रवार | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | 50 |

| स्पॅनिश भाषेचा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा ५०) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तुकडी | वार | प्रहर | वेळ | ठिकाण | विद्यार्थी संख्या |
| S I C 2 | सोमवार ते शुक्रवार | सायंकाळ | ६.३० ते ८.३० | Online | पन्नास |

| जपानी भाषेचा जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एकूण जागा ५०) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तुकडी | वार | प्रहर | वेळ | ठिकाण | विद्यार्थी संख्या |
| J I C 2 | सोमवार ते शुक्रवार | सकाळ | ७.३० ते ९.३० | Online | पन्नास |

## ❖ प्रवेशाचे वेळापत्रक

| जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रम : - (नव्याने शिकणाऱ्यांसाठी)<br>फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, जपानी<br>तास ९ जानेवारी २०२३ पासून सुरु होतील | पासून | पर्यंत |
|---|---|---|
| विद्यापीठाच्या CCEP portal वर अर्ज भरणे | २५/११/२०२२ | १५/१२/२०२२ |
| पहिली गुणवत्ता यादी | २१ डिसेंबर २०२२ सायं ६ वा | |
| पहिल्या यादीतील उमेदवारांनी शुल्क भरून आपली जागा निश्चित करणे | २५ डिसेंबर २०२२ पर्यंत | |
| दुसरी गुणवत्ता यादी | २७ डिसेंबर २०२२ सायं ६ वा | |
| दुसऱ्या यादीतील उमेदवारांनी शुल्क भरून आपली जागा निश्चित करणे | ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत | |
| तिसरी गुणवत्ता यादी (आवश्यकता पडल्यास) | ३ जानेवारी २०२३ दु १ वा | |
| तिसऱ्या यादीतील उमेदवारांनी शुल्क भरून आपली जागा निश्चित करणे | ५ जानेवारी २०२३ पर्यंत | |

**वि.सू. कृपया अर्ज भरताना नेमके गुण लिहावेत. गुणवत्ता यादी तयार करताना श्रेणी पुरेशी नाही.**

| जर्मन भाषेचा जलद पदविका अभ्यासक्रम<br>तास १५ फेब्रुवारी २०२३ पासून सुरु होतील | From | To |
|---|---|---|
| विद्यापीठाच्या CCEP portal वर अर्ज भरणे | २९/१२/२०२२ | २०/१/२०२३ |
| पहिली गुणवत्ता यादी | २५ जानेवारी २०२३ सायं ६ वा | |
| पहिल्या यादीतील उमेदवारांनी शुल्क भरून आपली जागा निश्चित करणे | ३१ जानेवारी २०२३ पर्यंत | |
| दुसरी गुणवत्ता यादी | २ फेब्रुवारी २०२३ सायं ६ वा | |
| दुसऱ्या यादीतील उमेदवारांनी शुल्क भरून आपली जागा निश्चित करणे | ५ फेब्रुवारी २०२३ पर्यंत | |
| तिसरी गुणवत्ता यादी (आवश्यकता पडल्यास) | ८ फेब्रुवारी २०२३ दु १ वा | |
| तिसऱ्या यादीतील उमेदवारांनी शुल्क भरून आपली जागा निश्चित करणे | १० फेब्रुवारी २०२३ पर्यंत | |

**वि.सू. जर कोणी समकक्ष शैक्षणिक पात्रतेच्या आधारे** GID साठी अर्ज केला असेल, तर त्यांनी तसे dflgerman19.20@gmail.com य इमेल पत्त्यावर आपले नाव व Application id कळवावे. जर अशा उमेदवारांची संख्या एकूण अर्जांच्या ३० टक्क्यांपेक्षा जास्त असेल, तर त्यांना प्रवेश परीक्षा द्यावी लागेल. त्याबाबत वेगळी इमेल अशा सर्व उमेदवारांना पाठवण्यासाठी ती नावे एकत्र असणे आवश्यक आहे.

## Fees

1. **अर्जाचे शुल्क रु 600/- (सर्वसाधारण उमेदवार) रु. 400/- (SC, ST उमेदवार)**
   **एकदा भरलेले अर्जाचे शुल्क परत मिळणार नाही.**
2. **अभ्यासक्रमाचे शुल्क** –

| | महाराष्ट्र अधिवास असलेल्यांसाठीचे शुल्क | |
|---|---|---|
| **अभ्यासक्रम** | **कालावधी** | |
| **जलद प्रमाणपत्र** | साडेचार महिने | 6170 |
| **जलद पदविका** | साडेचार महिने | 8120 |

महाराष्ट्र अधिवास नसलेल्यांसाठीचे अभ्यासक्रमाचे शुल्क दुप्पट, तर इतर शुल्क तेच राहील. परदेशी राष्ट्रीयत्व असेल तर अभ्यासक्रमाचे शुल्क तिप्पट, तर इतर शुल्क तेच राहील

**वि.सू. : सर्व प्रवेश गुणवत्तेनुसार व महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक आरक्षणाच्या नियमांनुसार होतील.**

**प्रवेश घेण्यासाठी :**

1. http://campus.unipune.ac.in/CCEP/Login.aspx य संकेतसथळावर जावे. जर तुमचे नाव विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आधीच नोंदलेले नसेल तर **Register** येथे टिचकी मारून नाव नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी. तेथे तुम्ही जे वापरकर्ता नाव (user name) व त्याचा परवलीचा शब्द (password) ठरवाल ते दर वेळी log in करताना आवश्यक असेल.
2. सुरुवातीला काही व्यक्तिगत व शैक्षणिक माहितीचा तपशील भरावा लागेल. **परकीय भाषा विभागाच्या अर्धवेळ अभ्यासक्रमांसाठी इयत्ता बारावी उत्तीर्ण किंवा समकक्ष (बारावीनंतर ३ वर्षांचा पदविका अभ्यासक्रम) एवढेच आहे.** जर्मन भाषेच्या जलद पदविका अभ्यासक्रमासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेचे गुणही आवश्यक आहेत. बाकी इतर कोणतीही शैक्षणिक पात्रता येथे दिल्याने काही फरक पडत नाही. विद्यापीठाच्या सर्वच प्रवेशांसाठी हा अर्ज असल्यामुळे विविध अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक पात्रतांचे पर्याय तुम्हाला दिसतील, ते भरण्याची गरज नाही. HSC अंतर्गत Special / General हा पर्याय निवडणे व Basic qualification अंतर्गत "HSC with 12 Std". समकक्ष अर्हता धारकांनी "SSC + 3 years Diploma" हा पर्याय निवडावा. नंतर "upload documents" वर जाऊन शैक्षणिक अर्हतेचे गुणपत्रक, तुमचा एक फोटो (सेल्फी नको) व सही जोडावी. तोच फोटो तुमचा प्रवेश निश्चित झाल्यावर ओळखपत्रासाठी वापरायचा आहे.
3. जर तुम्ही विद्यापीठाच्या एखाद्या पूर्ण वेळ अभ्यासक्रमासाठी आधीच नाव नोंदलेले असेल तर log in केल्यानंतर ही सर्व माहिती तुम्हाला उपलब्ध असेल.
4. या नंतर तुम्हाला परकीय भाषा विभागाच्या अभ्यासक्रमाचा अर्ज तयार करायचा आहे. त्यासाठी 'Application' वर टिचकी मारा. तेथे आधी All हा पर्याय निवडा. त्यानंतर तुम्हाला Then you Certificate / Diploma Courses हा पर्याय दिसेल. तो निवडा. मग तुम्हाला परकीय भाषा विभागाचे उपलब्ध अभ्यासक्रम दिसू लागतील. योग्य तो अभ्यासक्रम निवडून अर्ज पूर्ण करा.
5. अर्जाचे शुल्क Online भरायचे आहे. पैसे भरल्यानंतर तुमचा अर्ज छपाईसाठी तयार असेल. Print वर टिचकी मारली ती तुम्हाला ३ पाने दिसतील. प्राथमिक माहिती ; स्मरणयादी व कबुलीनामा ; शुल्काच्या पावतीच्या एकाच पानावर दोन प्रती. त्यावर तुमच्या अर्जाचा क्रमांकही असेल

(उदा FL- 22-23 - FIC - 0085). जर चलनाच्या पानावर अर्ज क्रमांक दिसत नसेल तर ते लगेच cspsupport@pun.unipune.ac.in आण fl@unipune.ac.in येथ मेल करून आमच्या लक्षात आणून द्यावे. विषय "FL Application Number not visible on Challan Page" हाच ठेवावा.

6. **आम्ही छापील अर्ज मागत नसलो तरी तुम्ही सदर अर्ज तुमच्या संगणकावर उतरवून ठेवावा.** त्याचा तुम्हाला पुढे उपयोग होईल.
7. जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची गुणवत्ता यादी H.S.C. वा समकक्ष परीक्षेतील गुणांनुसार तसेच सामाजिक आरक्षणाचे नियम पाळून तयार होईल.
8. सर्व गुणवत्ता याद्या परकीय भाषा विभाग येथे छापील स्वरुपात व परकीय भाषा विभागाच्या पानावर तसेच CCEP portal वर डिजिटल स्वरुपात विहित तारखांना लावण्यात येतील.
9. **आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी -**
   a. वेळेवर गुणवत्ता यादीत आपले नाव आहे का ते पाहून घ्या.
   **b.** तुमचे नाव गुणवत्ता यादीत असेल तर CCEP portal वर जाऊन log in करा व शुल्क online पद्धतीने भरा. **तुमचा प्रवेश निश्चित करण्यासाठी विहित कालावधीत अभ्यासक्रमाचे शुल्क भरणे आवश्यक आहे.** अन्यथा तुमची जागा प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना जाईल. **एकदा तास सुरु झाले की उशीरा येणाऱ्यांना पहिल्यापासून शिकवले जाणार नाही.**
   **c.** अभ्यासक्रमाचे शुल्क भरल्यानंतर तुम्हाला छापण्यासाठी तयार चलन दिसेल. याही चलनावर तुमचा अर्ज क्रमांक दिसणे अपेक्षित आहे. त्याची खात्री करा. सदर चलन म्हणजेच शुल्क भरल्याची पावती तुमच्या संगणकावर उतरवून ठेवा.

**Please note -**

1. नव्याने एखादी भाषा शिकू इच्छिणारे एकापेक्षा अधिक भाषांसाठी नव्याने प्रत्येक अर्ज व प्रवेश शुल्क भरू शकतील. मात्र एकापेक्षा अधिक गुणवत्ता याद्यांत नाव लागले तरीही प्रवेश कोणत्यातरी एकाच भाषेला घेता येईल. इतर भाषांच्या अर्जांचे शुल्क परत मिळणार नाही. जर तुम्ही चालू शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये दुसऱ्या एखाद्या अर्धवेळ अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला असेल, तर या जलद प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना अर्ज करण्यास तुम्ही पात्र नाही याची कृपया नोंद घ्यावी.
2. एखाद्या भाषेसाठी नव्याने ती भाषा शिकू इच्छिणाऱ्यांचे खूपच जास्त अर्ज आले, तुम्हाला त्या भाषेसाठी प्रवेश देता येत नसेल, आणि दुसऱ्या एखाद्या भाषेसाठीच्या जागा शिल्लक असतील, तर तुम्हाला त्या दुसऱ्या भाषेसाठी वेगळी प्रवेश अर्ज फी न भरता प्रवेश घेता येईल. तशी इमेल तुम्हाला आमच्याकडून येईल. म्हणून तुम्ही अर्ज भरताना second language preference देऊन ठेवा.
3. केवळ प्रवेश अर्ज तयार केला म्हणजे तुमचा प्रवेश निश्चित झाला असे नसते.
4. **तुम्ही दिलेली माहिती चुकीची असल्याचे आढळल्यास तुमचा प्रवेश रद्द होईल. अशा वेळी कोणताही परतावा मिळणार नाही.**
5. तुम्ही मागितलेली तुकडी तुम्हाला मिळेलच असे नाही. त्याचा उलगडा गुणवत्ता यादी लावतानाच केलेला असेल.